'लवासा' नि शरद पवार

पान २ वरून

बारामती विकास सोडल्यास एकाही तालुक्याचा विकास त्यांना साधता आलेला नाही. सध्या तर त्यांची घराणेशाही जोरात चाललेली आहे. पुतण्याला उपमुख्यमंत्री करून त्यांनी प्रचिती दिलेली आहे. 'लवासा'च्या माध्यमातून काय साध्य केले हेच उमजेनासे झाले आहे. कृषीमंत्री शरद पवार यांना शेतकऱ्यांचा विकास करण्याचा स्वप्न कधी पडणार नाही. श्रीमंतांना अधिक श्रीमंत करण्याचाच त्यांना स्वप्न पडणार आहे. कृषीप्रधान देशात देशाचा कृषीमंत्री शेतकऱ्यांचा विकास होण्याचे स्वप्न बघत नसेल तर ही लाजीरवाणी बाब आहे. शरद पवार स्वप्ने सत्यात उतरवतात. मग त्यांचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न का पूर्ण झालेले नाही. लवासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून त्यांना भिकेकंगाल करून देशोधडीला लावण्याचे पाप याच राज्यकर्त्यांनी केलेले आहे. पुन्हा कर्जमाफी देणार नाही. मागायचे बंद करा, असे ठणकावून सांगत आहे. मात्र आर्थिक विकास क्षेत्राच्या नावाखाली महाराष्ट्र विकायला काढण्याचे स्वप्नही त्यांनीच बघितले असणार कारण २००५ साली हा कायदा तयार करण्यात आलेला आहे. याला मंजुरी मिळवण्याचे सरकार प्रयत्न करीत आहे. उद्या आर्थिल विकास क्षेत्राचे स्वप्नही मीच बघितले होते असे सांगायला कृषीमंत्री मागे पडणार नाहीत. मग पुरोगामी महाराष्ट्रात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपल्याच काळात झालेल्या आहेत. त्याचे स्वप्न कुणी बघितले होते हे शरद पवार साहेब सांगू शकतील का?

साखर निर्यात बंदी हटवा

▶ पान १ वरून

'नाफा'ने आराखडा सादर करावा, अशी सूचना पंतप्रधानांनी केल्याचे समजते.

खासदार राजू शेट्टी (स्वाभिमानी शेतकरी संघटना), 'नाफा'चे डॉ. टी. हक, प्रा. महक सिंग (किसान जागृती मंच, उत्तर प्रदेश), प्रा. सुधीर पवार, राजकुमार दहिया (हरियाना), सी. बी. (नारळ उत्पादक संघटना, केरळ), प्रीतम चौधरी, अनिल सिंग, रमेश गद्दानवार (कर्नाटक राज्य रयत संघ) आणि जगदीश इनामदार आदी उपस्थित होते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमाफ 'त देण्यासाठी गहू, तांदळाप्रमाणे साखरेची खरेदी खुल्या बाजारातून का केली जात नाही?, असा प्रश्नही या शिष्टमंडळाने उपस्थित केला.

यंदाच्या साखर हंगामात उसाचे क्षेत्र वाढले असून, साखर उत्पादनही वाढण्याचा अंदाज आहे. या परिस्थितीमुळे साखर उद्योगात चिंतेचे वातावरण आहे. बऱ्याच राज्यांमध्ये ऊस उत्पादकांना पुरेसा मोबदला मिळालेला नाही. महाराष्ट्राच्या काही भागांसह कर्नाटक, आंध्र प्रदेशात तर शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघालेला नाही. त्यामुळे साखर क्षेत्राशी संबंधित धोरणाचा सरकारने फे रविचार करण्याची योग्य वेळ आहे. ते करण्याआधी प्रामुख्याने साखरेच्या निर्यातीवरील बंदी काढून टाकावी, लेव्ही रद्द करावी, उसाचे दर ठरविताना त्यात इथेनॉल आणि वीज उत्पादन याचाही विचार केला जावा, ऊस खरेदी रोखीने करण्याची सक्ती असावी, थकबाकीवर व्याजाची आकारणी व्हावी, आदी मागण्या पंतप्रधानांकडे करण्यात

मला वाटते, ते प्रदूषण करणारे महाप्रकल्प इथे शहरातच उभे करावेत! इथे पर्यावरण नसल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचा प्रश्नच नाही!!

vishal Yadav 9850291294
9921151199

इंडो प्रिंटर सर्व्हिसेस

Dot Matrix Specialist

■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling

चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.

९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

श्री भरत अर्बन को-ऑप बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग		स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

'आजरा'च्या विरोधात स्वाभिमानीचे आंदोलन

आजरा : आजरा वारणा युनिट नं ६ या कारखान्याने अंतिम दर द्यावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे अध्यक्ष जयवंतराव शिंपी यांच्या घरावर काढण्यात येणारा मोर्चा रद्द करून तहसील कार्यालयात बैठक झाली.

वारणा-आजरा उद्योग समूहाने दर देण्याबद्दल असमर्थता दर्शवली, तर स्वाभिमानीने अंतिम दरबद्दल मिळाला पाहिजे याबद्दल ठाम राहिल्याने तोडगा निघाला नाही. अंतिम दराबद्दल शुक्रवारी (ता. १७) वारणेवर बैठक घेण्याचे ठरले.

संघटनेतर्फे आज जयवंतराव शिंपी यांच्या घरावर मोर्चाचे आयोजन केले होते. तहसील कार्यालयावर मोर्चा अडविला. पोलिस निरीक्षक रमेश सरवदे यांनी विनंती केल्यावर तहसील कार्यालयात आजरा वारणा समूह व संघटनेचे प्रतिनिधी यांच्यात बैठक झाली.

राजेंद्र गड्डयान्नावर म्हणाले, ''जिल्ह्यातील कारखान्यांनी चांगला दर दिला आहे. पण आजरा वारणा युनिटकडून अंतिम दर मिळालेला नाही. उतारा चांगला असूनदेखील शेतकऱ्यांना दर मिळत नाही. २०७१ रुपयांची उचल दिली आहे. वारणा समूहाने शोभेल इतका दर द्यावा.''

आजरा कारखान्याचे युनिट मॅनेजर संजीव देसाई म्हणाले, ''आजरा कारखान्याशी वेळेत करार झाला नाही. तीन महिन्यांनंतर याबाबत निर्णय झाला. त्यामुळे साखरेला चांगला दर असताना त्याचा फायदा उठवता न आल्याने कारखाना तोट्यात गेला. निर्यात बंदी उठवल्यावर साखरेला चांगला दर मिळाल्यावर अंतिम दर देऊ.'' शिंपी यांनी भूमिका मांडली व सहकार्याचे आवाहन केले. अंतिम दराबद्दल तोडगा निघाला नाही. काही काळानंतर पुन्हा चर्चा करण्याचे ठरले. विनय कोरेंशी चर्चा करून सांगू असा निरोप देऊन वारणा, आजराचे प्रतिनिधी निघून गेले.

'वारणा'-'आजरा'ची ऊसतोड; वाहतूक बंद

मडिलगे : 'वारणा' व 'आजरा' साखर कारखाना युनिटची ऊसतोड व वाहतूक येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेमाफ 'त बंद पाडण्यात आली. उसाचे एकही ट्रक, ट्रॅक्टर कारखान्यात गेले नाहीत. मागील ऊसदराच्या अंतिम बिलाबाबत वारणा कारखान्याच्या व्यवस्थापनाने असमर्थता व्यक्त केल्यामुळे स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी कारखान्याच्या सेंटरना टाळेही ठोकले. दरम्यान, संघटनेच्या आंदोलनाला शेतकऱ्यांसह तोडणी, वाहतूकदारांनी पाठिंबा दिल्याने आंदोलन यशस्वी झाल्याचे संघटनेचे उपाध्यक्ष तानाजी देसाई यांनी सांगितले.

गेल्या हंगामातील फरक बिलाबाबत कारखाना व्यवस्थापन व प्रशासनादरम्यानच्या बैठकीमध्ये कारखाना व्यवस्थापनाकडून असमर्थता व्यक्त करण्यात आली. एफआरपीपेक्षा जास्त दर दिला आहे, असे निवेदन प्रशासनाला दिले. संघटनेशी कोणतीही चर्चा न करता निवेदन देण्याची कार्यवाही करण्यात आल्याने स्वाभिमानी संघटनेकडे आंदोलनाचा निर्णय घेतला. त्यामुळे आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात कारखान्याच्या सेंटरना टाळे ठोकण्यासह ऊसतोडणी व वाहतूक बंद पाडली. काही वाहने पोलिस बंदोबस्तात आणण्यात आली.

आज दिवसभर संघटनच्या कार्यकर्त्यांनी आजरा परिसरात तळ ठोकला. तालुका परिसरातील ऊसतोडणी बंद पाडली. तालुक्यासह बाहेरून येणारी उसाची वाहनेही रोखण्यात आली. परिणामी आज दिवसभर कारखान्याकडे उसाची वाहने पोचू शकली नाहीत. याबाबत तालुक्यातील शेतकरी, तोडणी कामगार व वाहतूकदारांनी स्वाभिमानी संघटनेच्या आंदोलनाला पाठिंबा दिल्याने आंदोलन यशस्वी झाल्याचा दावा करण्यात आला. उद्या (ता. ८) पासून आंदोलनाची तीव्रता वाढणार आहे. आजरा कारखाना अध्यक्ष जयवंतराव शिंपी यांच्या घरावर हजारोंचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

उस्मानाबादेतील ऊस उत्पादक चांगल्या दराच्या प्रतीक्षेत

उस्मानाबाद : गेल्या वर्षीच्या गाळप हंगामात पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या बरोबरीने उसाचा पहिला हप्ता जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी दिला होता. यंदाच्या गळीत हंगामात मात्र जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांनी एक हजार ५०० ते एक हजार ७०० रुपयांचा पहिला हप्ता दिला आहे.

नांदेड विभागात सर्वाधिक ऊस उत्पादन करणारा जिल्हा अशी ओळख असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी गेल्या वर्षीच्या (२००९ - २०१०) गळीत हंगामात पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या बरोबरीने उसाचा पहिला हप्ता दिला होता. केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना, रांजणी येथील 'एम - साई' खासगी साखर कारखाना, मुरूम येथील विठ्ठलसाई सहकारी कारखाना, सोनारी येथील भैरवनाथ खासगी कारखान्यांनी गेल्या हंगामात दोन हजार १०० रुपयांचा पहिला हप्ता दिला होता. चोराखळी येथील धाराशीव खासगी कारखान्याने जिल्ह्यात सर्वाधिक दोन हजार १५० रुपये पहिला हप्ता दिला होता. यंदा देखील उसाला चांगला दर मिळेल या अपेक्षेने शेतकऱ्यांनी भूजल पातळीत अपेक्षित वाढ झाली नसतानाही उसाची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. उन्हाळ्यात ऊस जगविण्यासाठी कूपनलिका खोदण्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करून ऊस जगविला.

या वर्षीच्या गळीत हंगामात मात्र जिल्ह्यातील कारखान्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांची बरोबरी केली नाही. तेथील काही कारखान्यांनी उसाचा पहिला हप्ता दोन हजारांच्या पुढे काढला आहे; मात्र जिल्ह्यातील दोन कारखान्यांनी उसाचे पहिले बिल एक हजार ५०० ते एक हजार ७०० रुपये काढले आहे.

जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'एन - साई', विठ्ठलसाई, भैरवनाथ, धाराशीव या कारखान्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या गळीत हंगामात या कारखान्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्यांच्या बरोबरीचा पहिला हप्ता दिला होता. या वर्षी मात्र तसे चित्र नाही. जिल्ह्यात यंदाच्या हंगामात जिल्ह्यात जवळपास ६० लाख टन ऊस उपलब्ध असल्याचा जाणकारांचा अंदाज आहे. त्यामुळे सर्व उसाचे गाळप होण्यासाठी कारखान्यांनी प्राधान्याने कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करणे गरजेचे आहे. परंतु काही कारखाने पश्चिम महाराष्ट्रातून ऊस आणत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात ऊस उपलब्ध असताना बाहेरुन आणण्याचा हेतू काय असेल, असे प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात विविध संघटना पहिल्या हप्त्यासाठी संघर्ष करीत आहेत. जिल्ह्यात मात्र ऊस उत्पादकांसाठी कोणताही राजकीय पक्ष, संघर्ष करायला तयार नाही.

कोल्हापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग

जयसिंगपूर : सततच्या विलंबामुळे १६५ कोटी रुपये खर्चावर पोचलेल्या सांगली–कोल्हापूर रस्त्याच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव आता बारगळण्याच्या मार्गावर आहे. याउलट कोल्हापूर ते सोलापूर हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग होणार असून त्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे सांगली–कोल्हापूर मार्गाची अपघाताच्या सापळ्यातून कायमची मुक्तता होणार आहे.

१९९९ पासून गाजत असलेल्या सांगली–कोल्हापूर रस्त्याच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव ४८ कोटी रुपयांवरून १६५ कोटी रुपयांवर पोचला आहे. चौपदरीकरणाचा प्रस्ताव बीओटी तत्त्वावर तीन वर्षांपूर्वीच तत्कालीन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या सततच्या प्रयत्नांतून राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केला होता. त्यानुसार निविदा प्रक्रियाही अंतिम टप्प्यात पोचली असतानाच तत्कालीन लोकप्रतिनिधींनी बीओटी तत्त्वाऐवजी सरकारी खर्चातून चौपदरीकरणाचा आग्रह धरला; तर शहरातील कृती समितीने नियोजित उड्डाणपुलाला विरोध केला. परिणामी सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ यांनी हा प्रस्तावच 'पेंडिंग' ठेवला. त्यानंतर मजले खिंड ते अंकली पथकर नाका हा मार्ग आणि अंकली पथकर नाका–जयसिंगपूर–मजले खिंड हा मार्ग असे दोन स्वतंत्र मार्ग तयार करून एकेरी

वाहतुकीच्या

मदतीने चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार झाला. त्यासाठी चार निविदा आल्या असून या निविदा मंत्री समितीच्या विशेष बैठकीसाठी प्रतीक्षेत आहेत. ही बैठक केव्हा होणार आणि या निविदांचे काय होणार, याबद्दल अनिश्चिततेचे वातावरण आहे.

राष्ट्रीय महामार्ग १२ मीटर रुंदीचा

राष्ट्रीय महामार्ग झाल्यास सांगली–कोल्हापूर मार्गाची रुंदी ७ मीटरवरून १२ मीटर होईल. मजले खिंड–तमदलगे– निमशिरगाव–अंकली पथकर मार्ग असणार नाही. जयसिंगपूर शहरात रुंदीकरणामध्ये कुणाची जागा, दुकाने जाऊ नयेत, यासाठी उड्डाणपूल बांधला जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार राजू शेट्टी यांनी कोल्हापूर ते नागपूर हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग व्हावा, अशी मागणी केली. त्यानुसार केंद्र सरकारमार्फत कोल्हापूर ते सोलापूर या मार्गाचे पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग तयार करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू झाले. त्यासाठी खासदार राजू शेट्टी यांनी खासदार सदाशिवराव मंडलिक, खासदार प्रतीक पाटील, खासदार सुशीलकुमार शिंदे आणि खासदार जयवंतराव आवळे यांची याबाबतची मागणीपत्रे घेऊन केंद्र सरकारला सादर केली. परिणामी हा प्रस्ताव आता मंजुरीच्या अंतिम टप्प्यात पोचला आहे. यासंदर्भात खासदार राजू शेट्टी यांनी नवी दिल्ली येथून आज 'सकाळ'शी बोलताना सांगितले, की केंद्र सरकारच्या छाननी समितीसमोर कोल्हापूर–सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचा प्रस्ताव आला असून येत्या काही दिवसांत या प्रस्तावाला अंतिम मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. त्यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. राष्ट्रीय महामार्ग म्हणून हा मार्ग दर्जेदार आणि चौपदरीकरणाएवढाच होईल. त्यासाठी केंद्र सरकारचा निधी उपलब्ध होणार आहे. परिणामी राज्य सरकारचा बीओटी तत्त्वाच्या चौपदरीकरणाच्या प्रस्तावाची अंमलबजावणीची गरजच राहणार नाही. नवा राष्ट्रीय महामार्ग अपघातांची मालिका संपवणारा ठरेल. भविष्यात कुणाचाही बळी जाऊ नये, हीच आपली प्रामाणिक इच्छा आहे. त्यासाठीच आपण प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहोत, असेही श्री. शेट्टी यांनी सांगितले.

सहकारमंत्र्यांना 'स्वाभिमानी'च्या कार्यकर्त्यांनी अडविले

बुलडाणा (स्वाभिमानी वृत्तसेवा): हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होऊन समाधानकारक तोडगा निघाला नाही तर मंत्र्यांच्या गाड्या अड्डू व मंत्र्यांना जिल्हाबंदी करू सा इशारा देणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांना अडविण्यात आले.

स्वाभिमानी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केलेल्या घोषणेनुसार खामगाव - चिखली रोडवरील अमडापूरनजीक दहेगांव फाट्यावर सकाळी १० वाजता त्यांच्या नेतृत्त्वाखाली अडविण्यात आले. कार्यकर्ते रस्त्यावर झोपलेले पाहून सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील गाडीतून खाली उतरले व मी चर्चा करण्यात तयार आहे. आपण रस्त्याच्या बाजूला या, अशी विनंती केली. सर्व कार्यकर्त्यांनी त्यांना घेरोओ घालून सरकारच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडताना रविकांत तुपकर यांनी सोयाबीनला जागतिक बाजारपेठेप्रमाणे ३००० रूपये व कापसाला ५००० रूपये, आयात होणाऱ्या पामतेलावर ६० टक्के आयात कर, कृषिपंपाचे तोडलेले ५०००० कनेक्शन त्वरीत जोडून द्या, कापूस आणि साखरेवरची निर्यातंबदी उठवा, सावकारगस्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजेत. तसेच स्वतंत्र विदर्भ राज्य झाले पाहिजे. या मागण्या त्यांनी मांडल्या. या प्रत्येक मागणीवर हर्षवर्धन पाटील यांनी चर्चा केली. परंतु कार्यकर्त्यांचे समाधान न झाल्याने जोरजोरात घोषणाबाजी करू लागले. खासदार राजू शेट्टी यांचा विजय असो अशा घोषणांनी आसनंत दुमदुमला.



बुलडाणा : येथे स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांना घेराओ घातला. त्यावेळी रविकांत तुपकर.

हर्षवर्धन पाटील यांच्याशी बोलताना स्वाभिमानी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर म्हणाले की, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी उसाला पहिली उचल २००० रूपये दिलेली आहे. मात्र तुमच्या ताब्यात असलेल्या इंदापूर कारखान्याने १५०० रूपये दिलेले आहेत. यावर हर्षवर्धन पाटील निरूत्तर झाले. सरकारने १००० कोटींची भरपाईची घोषणा करून सरकारने शेतकऱ्यांच्यावर उपकार केलेले नाहीत. सरसकट नुकसान भरपाई शेतकऱ्यांना दिली गेली पाहिजे. या मागण्या अधिवेशनात मान्य न झाल्यास तर तुमचा बंगला फोडला जाईल असा सज्जड इशाराही त्यांनी यावेळी दिला. मुख्यमंत्र्यांशी चचा करून निर्णय घेऊ असे आश्वासन देऊन सहकारमंत्र्यांनी काढता पाय घेतला. यावेळी बबनराव चेके, लखल गाडेकर, गजानन उबरहंडे, राणा चंद्रशेखर सदन, सुभाष गिरी, श्रावण गवई, अमरसिंग राठोड, बाबूराव नाईक, गजानन पवार यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वाभिमानी ने केला तहसीलसमोर दिवसभर उपवास आंदोलन

शेगाव(स्वाभिमानी वृत्तसेवा): सोयाबीनला जागतिक बाजारपेठेप्रमाणे ३००० रूपये व कापसाला ५००० रूपये, आयात होणाऱ्या पामतेलावर ६० टक्के आयात कर, कृषिपंपाचे तोडलेले ५०००० कनेक्शन त्वरीत जोडून द्या, कापूस आणि साखरेवरची निर्यातंबदी उठवा, सावकारगस्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजेत.

तसेच स्वतंत्र विदर्भ राज्य झाले पाहिजे या मागणीसाठी स्वाभिमानी युवा संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालयासमोर दिवसभर उपवास करून अनोखे आंदोलन केले. प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

मेहकर: येथे सकाळी १० वाजल्यापासून उपवास आंदोलन करण्यात आले. शेतकरी हितासाठी रस्त्यावर उतरू असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामध्ये सचिन शिरसाट, श्रीकृष्ण जेऊवाले, भास्कर चोपडे, अमरसिंग राठोड, रवी तेलगोटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

चिखली: चिखली येथे उपवास आंदोलन करण्यात आले. यावेळी सिध्दार्थ पैठणे, नंदू पांढरे, प्रकाश घुवे, सुबोध कापसे, निवृत्ती शेडगे, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच शेगाव, मोताळा, संग्रामपूर, खामगाव ब बुलडाणा आदी तालुक्यात उपवास आंदोलम करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शासनाचे लक्ष वेधून घेतले.

साखर उद्योगातील तेजीमुळे ग्रामीण बाजारही झळाळणार!

बारामती : उसाची प्रचंड उपलब्धता व साखरेचे चांगले भाव या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंगामामध्ये एकट्या पुणे जिल्ह्याच्या बाजारपेठेत किमान पाचशे कोटी रुपयांहून अधिक पैसे अतिरिक्त येतील, असा अंदाज आहे. पुणे जिल्ह्याचे अर्थकारण प्रचंड मजबूत होण्यासाठी या पैशांचा उपयोग होणार असून यामुळे बाजारपेठेलाही कमालीची चालना मिळेल असा अंदाज आहे. जिल्ह्यातील १२ सहकारी व चार खासगी साखर कारखान्यांचा विचार केला तर यंदाच्या हंगामात सरासरी ११० लाख टन उसाचे गाळप झाले व सरासरी दोन हजार रुपयांचा भाव मिळाला तर हंगामात २२०० कोटी रुपये यंदा सभासदांना कारखान्यांकडून वाटप होईल असा अंदाज आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पुणे जिल्ह्यातील सर्वच सहकारी व खासगी साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात प्रचंड प्रमाणात ऊस उपलब्ध आहे. उसाची वाढती उपलब्धता विचारात घेऊन जिल्ह्यातील 'सोमेश्वर', 'नीरा भीमा', 'इंदापूर', 'घोडगंगा' यांसारख्या कारखान्यांची उसाची गाळपक्षमता वाढविली. त्यामुळे कमी कालावधीत अधिक उसाचे गाळप शक्य होणार आहे. उसापासून साखरेबरोबरच काही कारखान्यांनी सहवीजनिर्मिती प्रकल्प

सुरू केले असून त्यांची वीजविक्री सुरू आहे, त्यामुळे त्याचाही फायदा सभासदांना निश्चितपणे होणार आहे. भावाचे गणित विचारात घेतले तर यंदाचे वर्ष अनेक दृष्टीने पुण्यासाठी ऐतिहासिक असेच ठरणार यात शंका नाही.

पुणे जिल्ह्यात 'माळेगाव', 'सोमेश्वर', 'छत्रपती', 'इंदापूर', 'नीरा-भीमा', 'पाटस', 'घोडगंगा', 'थेऊर', 'विघ्नहर', 'भीमाशंकर', 'संत तुकाराम', 'राजगड' हे बारा सहकारी तर 'अनुराज', 'दौंड शुगर', 'बारामती ॲग्रो', 'श्रीनाथ म्हस्कोबा' हे चार खासगी असे एकूण सोळा साखर कारखाने आहेत. या प्रत्येक कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गाळपाची आकडेवारी कमी अधिक प्रमाणात वेगवेगळी आहे. यात भाव व गाळप यांच्या गणितावर त्या कारखान्याच्या सभासदांना एकूण किती पैसे मिळणार याचा आकडा ठरेल. यंदा पूर्वीच्या हंगामाच्या तुलनेत सर्वच कारखान्यांचे गाळप अधिक होणार असल्याने गतवर्षीपेक्षा यंदा अधिक पैसा सभासदांना मिळणार हे उघड आहे. सरासरी प्रत्येक कारखान्याने ३० कोटी रुपये गेल्या वर्षीपेक्षा यंदा अधिक दिले तर किमान ५०० कोटी रुपये यंदा कार्यक्षेत्रात अधिक येतील अशी शक्यता आहे.

यात 'सोमेश्वर' सहकारी साखर कारखान्याचेच उदाहरण घ्यायचे झाले तर २००९-२०१० या आर्थिक वर्षात २५०१ रुपये ॲडव्हान्स पेमेंट कारखान्याने केलेले आहे. या हंगामात सात लाख ११ हजार टन उसाचे गाळप झाले आहे. याचा हिशेब केला तर कारखान्याने १७७ कोटी ८२ लाख रुपयांचे वाटप केलेले आहे. २०१०-२०११ या आर्थिक वर्षात कारखान्याकडे १२ लाख टन उसाची उपलब्धता आहे. कारखान्याची गाळपक्षमता विचारात घेतल्यास कार्यक्षेत्रातील उसाचे पूर्णपणे गाळप झाले व कारखान्याने किमान दोन हजार रुपये भाव दिला, तर २४० कोटी रुपये कार्यक्षेत्रातील सभासदांकडे जातील याचाच अर्थ फक्त सोमेश्वरच्याच कार्यक्षेत्रात जवळपास ६२ कोटी रुपये अधिक जातील.

कापसाच्या दरात वाढ

जळगाव (प्रतिनिधी) : कापसाचे दर कधी नाही ते यंदा साडेचार हजार रुपयांवर जाऊन पोचले आहेत. गाठींच्या भावातील दरवाढीने उच्चांक गाठल्याने, कापसाचे दर उत्तरोत्तर चढेच राहिले आहेत. परिणामी, जिनिंग प्रेसिंगच्या माध्यमातून कापसाचा व्यापार करणाऱ्या किरकोळ व ठोक व्यापाऱ्यांचा भांडवली खर्च आवाक्याबाहेर गेला आहे. तशात शेतकरी स्वस्तात कापूस देण्यास तयार नसल्याने संबंधितांची मोठी कोंडी झाली आहे.

अमेरिकेसह चीन, पाकिस्तान, बांगलादेशासारख्या प्रमुख कापूस उत्पादक देशात या वर्षी अस्मानी संकटामुळे कापसाचे पीक वाया गेले आहे. जेवढे काही पीक शिल्लक राहिले आहे, त्यापासूनही फार काही उत्पन्न मिळण्याची आशा नाही. अशा परिस्थितीत कापसाची गरज भागविण्यासाठी परराष्ट्रांकडून साहजिकच भारताकडे मोठ्या आशेने पाहिले जात आहे. त्यासाठी 'मूँह मांगा दाम' देण्याचीही तयारी त्यांनी दाखवली आहे.

भारताने गेल्या वर्षी संपूर्ण हंगामात सुमारे ८५ लाख गाठींची निर्यात केली होती. यंदा दीड लाख गाठींची निर्यात केली तरी त्यांना कापूस अपूर्ण पडेल, अशी स्थिती आहे. या एकूण परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाचे दर वधारलेले असताना, देशांतर्गत कापसाच्या बाजारातही तेजीचे वातावरण कायम राहिले आहे. दरातील झळाळी पाहून, कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्येही प्रचंड उत्साह संचारला आहे. कापसाच्या दरवाढीचा अंदाज घेऊन कापूस विकायचा की नाही, याचा निर्णय शेतकरी विचारपूर्वक घेत आहे. पूर्वी, भाव उतरण्याची नुसती अफवा पसरली की शेतकरी कापूस विकून मोकळे होत. यंदा प्रथमच शेतकरी भावासंदर्भातील कोणत्याही अफवांना भीक घालीत नसल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कापसाच्या दरातील बदल जाणून शेतकरी निर्णय घेत आहेत. 'पणन'सह 'सीसीआय'चे दर कमी असल्याच्या स्थितीत खानदेशात गेल्या वर्षी खासगी व्यापाऱ्यांकडून खरेदी झालेला सुमारे २०० ट्रक कापूस रोज गुजरातकडे रवाना केला जात होता. त्यामुळे गावोगावी फिरून कापसाची खेडा खरेदी करणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांसह दलालांनाही सुगीचे दिवस आले होते; मात्र यंदा साडेचार हजारावर कापसाचे दर गेल्याने आधीच त्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यात शेतकरी 'साडेचार हजार प्रति क्विंटलने कापूस घेत असाल तर बोला', असे ठणकावून सांगू लागला आहे. कमी भावात कापूस द्या म्हटल्यावर कोणताच शेतकरी उभा करीत नाही. खेडा खरेदीला आपोआपच मर्यादा आल्या आहेत. ज्या गावातून रोज किमान दीडशे क्विंटल कापूस विकत मिळायचा; तेथे आता दहा क्विंटल इतकाही कापूस मिळेनासा झाला आहे.

स्वाभिमानी बहुउद्देशिय संस्थेच्या आरोग्य शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

जयसिंगपूर (प्रतिनिधी): येथील लमाण वसाहतीमध्ये स्वाभिमानी बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या पहिल्या मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधे वितरण शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब कारंडे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जि. प. सदस्य सावकार मादनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. नुकतेत जयसिंगपूर शहरात खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते मेडिसिन बँकेच उद्घाटन करण्यात आले होते. त्यावेळी याला मोठा प्रतिसाग लाभला होता. यानंतर शहरवासियांनी विविध आजारांवरील औषधे मोठ्या प्रमाणात संस्थकडे जमा केली होती. यावेळी डॉ. अजित बिरनाळे, डॉ. किरण पाटील, डॉ. संतोष मोठके यांनी मोफत रूग्णांची तपासणी केली व योग्य त्या रूग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्याने मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. अजित बिरनाळे म्हणाले, लमाण वसाहतीमधील समाज हा कष्टकरी समाज असून आजपर्यंत म्हणावी तशी प्रगती या लोकांची होऊ शकली नाही. अज्ञानामुळे बरेच असाध्य आजार होण्याची शक्यता असल्याने शक्य तितक्या जास्तीत जास्त लोकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.यावेळी संस्थेचे अध्यक्ष शैलेश चौगुले म्हणाले की, यापुढील काळामध्ये स्वाभिमानी बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने कष्टकरी समाजातील ठराविक असाध्य आजार असलेल्या लोकांना आयुष्यभर मोफत औषधोपचार करण्यासाठी नियोजन असून यासाठी लोकांनी सहकार्य करावे. यावेळी ३०० हून अधिक लोकांनी याता लाभ घेतला. यावेळी नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे, सुभाष शेट्टी, शहराध्यक्ष शैलेश आडके, सुनिल खवाटे, सागर मादनाईक, राजू नरदे, मानतेश पवार, महावीर पाटील व युवासम्राट ग्रपुचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

'स्वाभिमानी' संघटना निवडणुकीत उतरणार

कोगनोळी : दोन वर्षांपासून चिक्कोडी तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या हितासाठी आपली ताकद लावत असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे आगामी जिल्हा आणि तालुका पंचायत निवडणुकीत संघटना उतरणार का, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे; शिवाय संघटनेने निवडणुकीत उतरावे, अशी मागणीही होत आहे.

संघटना गावोगावी सक्रिय होत आहे. शेतकऱ्यांवरील अन्याय, दराबाबतचे आंदोलन, वजनकाट्याबाबत तक्रार अशा माध्यमांतून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची अडचण व समस्या तसेच सार्वजनिक विकासकामे शासन दरबारी मांडून सार्वजनिक विकास साध्य करण्यासाठी जिल्हा व तालुका पंचायत निवडणुकीत आपले उमेदवार उभे करतील, अशी चर्चा शेतकऱ्यांतून होत आहे.

कोगनोळी परिसरात मागणी

शेतकरी हा देशाचा कणा असताना शेतकऱ्याच्या प्रश्नांवर शासन दरबारी कुणी आवाज उठवत नाही. त्यासाठी येणाऱ्या तालुका पंचायत व जिल्हा पंचायत निवडणुकीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी लक्ष घालून चिक्कोडी तालुक्यासह बेळगाव जिल्ह्यात आपले उमेदवार उभे करावेत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राबरोबर चालू वर्षी शेतकऱ्यांना थोडे यश मिळाले आहे. त्यासाठी आता आगामी तालुका पंचायत व जिल्हा पंचायत निवडणुकीत शेतकरी संघटनेतर्फे काही जागा लढवून आपले काही प्रतिनिधी शासन दरबारी पाठविल्यास ते शेतकरी वर्गाला न्याय देतील, अशी आशा शेतकऱ्यांना वाटते आहे.

खासदार राजू शेट्टींनी लोकसभेत उपस्थित केलेले प्रश्न

नवी दिल्ली (स्वाभिमानी वृत्तसेवा):

१ सध्या विजेची टंचाई पाहता तसेच शासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात वीजेचा वापर होत असताना सर्वच शासकीय कार्यालयात सौर ऊर्जा संयत्र कधी बसविण्यात येणार आहेत?

२ कृषी मंत्रालयाने अथवा कृषी मूल्य आयोगाने पेट्रोलमध्ये इथेनॉल मि सळण्यासंबंधी कोणता प्रस्ताव पाठवला आहे ?

३ जर प्रस्ताव पाठवला असेल तर २०११ - १२ च्या उसाची एफआरपी ठरवताना हा प्रस्ताव एफआरपी मध्ये सामील केला जाणार आहे की नाही?

४ महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतावर पर्वताचे हरित क्रांती राखण्याच दृष्टीने कोणत्या उपाययोजना आखल्या गेल्या आहेत.

५ सरकारने सेना व पोलिस अधिकारी यांच्यातपदांची तुलनासंबंधी अधिसुचना जारी केली आगे काय?

६ शालेय ल आरोग्य स्तरावरील कर्मताऱ्यांना राज्य विमा संरक्षण चालू केली आहे की नाही?

७ पशुपालन विकास योजना कोणकोणत्या राज्यात राबविण्यात येणार आहेत?

निर्यातीच्या जादा दराची संधी हुकली

नगर : जागतिक बाजारात साखरेची तेजी असताना निर्यात करण्याची संधी असतानाही वाणिज्य मंत्रालयाकडून मिळालेल्या 'लाल सिग्नल'मुळे साखर कारखान्यांना साखर निर्यात करता आली नाही. दोन पैसे जादा मिळण्याची संधी आता जागतिक बाजारातील साखरेच्या दरात शंभर डॉलरने घट झाल्याने साखर कारखान्यांनी गमावली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून साखरेच्या निर्यातीचा साखर कारखानदारांचा आग्रह आहे. शेतकरी संघटनेनेही साखर निर्यात करण्यासाठी 'रेल-रोको' आंदोलन केले. खासदार राजू शेट्टी यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची भेट घेतली. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी साखर निर्यातीचे वायदे बऱ्याचदा केले. त्यासंबंधीचा अहवाल दिला; परंतु उशिरापर्यंत लांबलेला पाऊस, तसेच अद्यापही थंडी नसल्याने साखरउताऱ्यात घट झाली आहे; त्यामुळे देशाचे साखर उत्पादन पूर्वी गृहीत धरलेल्या अंदाजापेक्षा ८.७ टक्क्यांनी कमी होण्याचा सुधारित अंदाज जागतिक पातळीवर काम करणाऱ्या एका संस्थेने दिला आहे. साखरेच्या उताऱ्यात घट होत असल्याने कारखान्यांना कोट्यवधी रुपयांच्या तोट्याला सामोरे जावे लागते आहे.

शेतकऱ्यांनी उसाला जादा भाव मिळावा, यासाठी आग्रह धरला आहे. रिझर्व्ह बँकेची बंधने, घटता साखर उतारा यामुळे कारखान्यांना चिंता आहे. रशिया, पाकिस्तान, इंडोनेशिया आदी देशांत साखरेची टंचाई आहे. भारतीय साखरेची या देशांना उत्सुकता आहे; मात्र निर्यातीचा निर्णय वेळेवर होत नसल्याने

निर्यातीच्या माध्यमातून जादा पैसे मिळवून ते शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न अजून तरी यशस्वी झालेला नाही. गेल्या काही दिवसांपूर्वी साखरेला जागतिक बाजारात ८१० डॉलर प्रति टन भाव होता. नोव्हेंबरमध्ये किमान पाच लाख टन तरी साखर निर्यात होईल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात साखर निर्यात झाली नाही. आता शंभर डॉलरने भाव उतरले आहेत. साखर निर्यातीचा निर्णय झाला, तरी त्याची अंमलबजावणी होण्यास दीड-दोन महिने लागतात. त्यामुळे साखर निर्यातीचा निर्णय आता झाला, तरी त्याची अंमलबजावणी होण्यास वेळ लागेल. तोपर्यंत जागतिक बाजारात ब्राझीलची साखर यायची शक्यता आहे. साखरेची निर्यात करण्यासाठी राष्ट्रीय साखर संघ व इस्मा (इंडियन शुगर मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन)चा दबाव वाढतो आहे. केंद्र सरकार केव्हा साखर निर्यात करते, याकडे साखर उद्योगाचे लक्ष लागले आहे.

भावात सुधारणा

केंद्र सरकारने या महिन्यांसाठी १७ लाख आठ हजार टनांचा कोटा खुला केला होता. गेल्या महिन्याच्या तुलनेत ९३ हजार टनांनी कोटा जादा असल्याने साखरेला ग्राहक नव्हते. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात भाव सत्तर रुपयांनी कमी झाले होते. या पार्श्वभूमीवर आता साखरेला मागणी वाढली आहे. मोहरम, लग्नसराई, तसेच नाताळ लक्षात घेऊन साखरेच्या भावात पुन्हा वाढ व्हायला लागली आहे. आता एम. ३० ला सरासरी २९०० रुपयांच्या दरम्यान दर आहेत.

महाराष्ट्राचे २०७ तुकडे करण्याचा सरकारी डाव?

महाराष्ट्रातील बहुचर्चित विशेष आर्थिक क्षेत्रांच्या संसदे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मंजूर करून सरकारचा इरादा आहे. विरोधकांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. विशेष आर्थिक क्षेत्र उभारल्यामुळे मागास व पुढारलेल्या भागातील तफावत दूर करून रोजगार निर्मिती करून राज्याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास करता येईल. असा मुद्दा उपस्थित करून २००५ साली उद्योगधंद्याला अलुकूल असा कायदा करण्याचा मुद्दा मांडण्यात आला.

सरकारने प्रस्तावित केलेले विधेयक राज्यातील जनतेच्या किंवा राज्याच्या हितसंबंधापेक्षा काही मूठभर उद्योगपतींचे हितसंबंध नजरेसमोर ठेवून तयार केले गेले आहे. असे स्पष्टपणे दिसते. राज्यातील उद्योगधंद्यांना भरीव सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. अशा अनेक मागण्या उद्योग जगताकडून होत आहे. १० वर्षाक सरकारने या मागण्या पूर्ण केल्या नाहीत. मात्र या मागण्यांचा आडोसा घेऊन राज्य सरकार जो अधिनियम आणायला निघाले आहे तो पाहता हा कायदा अस्तित्वात आला तर महाराष्ट्राचे राज्य म्हणून शिल्लक राहिल का असा प्रश्न आहे. या कायद्यात उद्योग जगताला अमर्यादीत अधिकार आहेत. शेतकऱ्यांच जमिनी कब्जात घेण्याचा मोठा डाव यामध्ये केला जात आहे. याम ध्ये एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. समितीमध्ये महसूल, कृषी व अर्थ खात्यांचे सचिव यामध्ये असणार नाहीत. आणि ही समिती शेतकऱ्यांच्या जमिनी कब्जात घेणार पण कृषी सचिवांना याची गंधवार्ता नसणार.

या अधिकार प्रदान समिती ला कर गोळा करण्यापासून ते भू संपादन प्रक्रिया सुकर करण्यापर्यंतचे सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच त्यांना घेतल्याला निर्णयाला कुठल्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. कधीही कुणाचीही कुठलीही ही समिती जमिन बळकावू शकणार आहे. शेतकऱ्यांना भूमिहीन करून त्यांना भिकेकंगाल करण्याच डाव राज्य शासनाचा आहे. हा कायदा राज्याचे अधिकार कमी करणार असून राज्याचे उत्पनही कमी करणार आहे. तसेच सगळे अधिकार देऊनही हे विशेष आर्थिक क्षेत्र राज्याला एक दमडीही कर देणार नाही. तसेच हा कायदा राज्य वीजनियामक आयोगा आणि राज्य पाणी दर आयोगाच्या अधिकारांमधून या क्षेत्रांना पूर्ण मुक्तता देत आहे.

यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, औद्योगिक आणि कृषी विकास, राज्यातील पायाभूत सुविधा, विकासाचे प्रादेशिक संतुलन या सर्वांवर या विधेयकावे दूरगामी परिणाम होणार आहेत. राज्याच्या औद्योगिक विकासाला यापूर्वीच ग्रहण लागलेले आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या विरोधाला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागणार आहे. या कायद्यानुसार अस्तित्वात येणार विशेष आर्थिक क्षेत्र हे सर्वार्थाने स्वंतत्र राज्य बनणार आहे. कारण महाराष्ट्राच्या विधीमंडळाचे, राज्य सरकारचे किंवा न्यायव्यवस्थेचे कोणतेही नियंत्रण त्यांच्यावर असणार नाही. महाराष्ट्राच्या भूमीवर ही २०७ संस्थाने जन्माला येतील असा या कायद्याचा अर्थ आहे. महाराष्ट्र सरकार सांगते आहे की गुजरात धर्तीवर विशेष आर्थिक क्षेत्र राबविली जाणार आहे. सुपीक व सिंचनाखालील जमीन विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी मिळणार नाही, तसेच १०० टक्के निर्यात करणाऱ्या उद्योगालाच विशेष आर्थिक क्षेत्राचा लाभ मिळणार आहे. शिवाय कोणत्याही सवलती ५ वर्षापेक्षा जास्त मिळणार नाही. असा गुजरातमध्ये कायदा आहे. मात्र आपल्या महाराष्ट्रात याच्या नेमका उलचा कायदा आहे. कारण कोणतीही जमिनी बळकावता येणार आहे. सर्व उद्योगधंद्याला या सवलतीचा लाभ मिळणार आहे. तसेच २५ वर्षे सवलतीचा लाभ मिळणार आहे. यामुळे महाराष्ट्र विकायला काढण्याचा डाव या राज्य शासनाचा आहे. महाराष्ट्रातील जनता उद्या या उद्योगजगतातील उद्योगपतींच्या हातचे बाहुले बनून राहणार आहे.

जाचक नियमांमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे वाऱ्यावर

बुलडाणा(स्वाभिमानी वृत्तसेवा): बुलडाणा जिल्हा सततच्या शेतकरी आत्महत्यांच्या दृष्टचक्राने काळवंडला आहे. सिंचनाच्या अत्यल्प सोयी, कोरचे अवर्षण व कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस परिणामतः सततची नापिकी, सहकारी बँकांची मनमानी वसुली, कर्जाचा वाढता डोंगर यामुळे शेतकरी आत्महत्येने अक्षरशः थैमान घातले आहे. २००० ते २०१० या अकरा वर्षात बुलढाणा जिल्ह्यात ११०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघड झालेले आहे. बुलडाणा जिल्ह्यात दरवर्षी १०० ते ११० शेतकरी आपली जीवनयात्रा संपवतात.

शेतकरी पॅकेज जिल्ह्यातीलच नव्हे तर आत्म हत्यांग्रस्त जिल्ह्यासह विदर्भासाठी थातूरमाथूर उपाययोजना ठरविले आहे. आत्महत्या थांबयला तयार नाहीत हे दृष्टचक्र व सत्र सुरूच आहे.यावर्षात आतापर्यंत जिल्ह्यात १०७ शेतकरी आत्महत्या झाले. ३ दिवसात एक शेतकरी आत्महत्या करतो. असे विदारक चित्र आहे.

राज्य शासन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भातअजिबात संवेदनशील नाही. याउलट शेतकऱ्यांच्या आत्महत्या कृतघ्न सरकारकडून होताना दिसत आहे. सरकारी आकडेवारीनुसार गेल्या १० वर्षात एकूण ११०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यात ३७८ आत्महत्या ठरविण्यात आलेल्या आहेत. शासकीय यंत्रणांनी ७०८ शेतकरी आत्महत्येसाठी अपात्र ठरविले आहेत. आत्महत्या केलेल्या अक्षरशः वाऱ्यावर सोडले आहे.

शेतकरी आत्महत्या आर्थिक मदतीसाठी पात्र ठरण्याचे शासनाचे निकष जाचक व चुकीचे आहेत. या जाचक व चुकीच्या निकषामुळे वारसदार व कुटुंबीय आर्थिक मदतीपासून वंचित राहतात. शासकीय यंत्रणांनी कर्जबाजारीपणा व नापिक असे शेतकरी आत्महत्येचे कर्जबाजारी शेतकरी आत्महत्यांना प्रथम प्राधान्य देऊन मदत देण्याचा शासनाचा शिरस्त आहे. मदतीसाठी पात्र ठरलेल्या ३७८ आत्महत्या आहेत. कर्जबाजारी,३२४ व नापिक झालेले ५४ असे शेतकरी होते. आत्महत्या केलेले ७०८ शेतकरी या किंवा मदतीच्या आर्थिक निकषात बसण्यास अपात्र आहेत असे मत आहे. सरकारच्या शासकीय यंत्रणा शेतकरी आत्म हत्येच्या संदर्भात संवदेनशील वृत्ती नाही. काम न करता केवळ तांत्रिक निकषाच्या अनेकवेळा शेतकऱ्यांवर बँक सोसायटयांचे कर्ज नसते. खासगी सावकारांकडून त्यांनी तोंडी कर्ज घेतलेले असते. नापिकीमुळे जसे उदरनिर्वाह करून संसाराचा गाडा सुरळीत चालवणे, मुलांमुलींचे शिक्षण, मुलींचे लग्ने, कुटुंबातील सदस्यांच्या दुर्धर आजारांचा खर्च मजुरी मशागतीचा खर्च या सगळ्यांचा सामना करणे त्याला कठिण होऊन जाते. उव्दिग्नता, मनस्ताप धैर्य खचणे, जीवनाबद्दल नैराश्य आदी प्रकारांना देखील बळी पडतात. शेतकरी आत्महत्येची मुलभूत कारणीमंमासा करण्याच्या फंदात शासकीय यंत्रणा पडत नाही. शासन शक्यतोवर शेतकरी आत्महत्या या आर्थिक मदतीसाठी पात्र ठरवू नका असे शासकीय व वरिष्ठ यंत्रणाचे जिल्हा प्रशासन तोंडी व आतून शेतकरी आत्महत्या आर्थिक मदतीसाठी अपात्र ठरतात. बुलडाणा जिल्ह्यात २००० पासून आजतागायत गेल्या ११ वर्षात ३ वेळी ओला दुष्काळ पडलेला आहे. कोरडवाहू शेतीचे या १० वर्षात ४० ते ५० टक्के उत्पन्न घटले आहे. वीज भारनियममामुळे देखील १० ते १५ टक्के आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी जे विशेष आर्थिक पॅकेज दिले. त्याचा फारसा फायदा शेतकऱ्यांना झाला नाही. सिंचन व्यवस्था जलस्तर वाढल्याने कृषीखाते गब्बर झाले. पुरवठादार, कंत्राटदारांनी देखील या संधीचे सोने केले. शेतकरी मात्र वाऱ्यावरच राहिला. दुर्देवाने त्याला बुलडाणा जिल्ह्यात १०० ते १२५ शेतकरी आत्महत्या का होतात याचा वस्तुमिष्ठ शोध व शासकीय यंत्रणांनी घेऊन सर्वव्यापी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. सोबतच आर्थिक मदतीसाठी अपात्र ठरलेल्या ७०८ कुटुंबियांना वाऱ्यावर न सोडता पुर्नपडताळणी करून आर्थिक मदत द्यावी असे अपेक्षा आहे.

अन्नसुरक्षाबाबत चुकीचे धोरण

नवी दिल्ली : सोनिया गांधींच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळाने अन्न सुरक्षेबाबत केलेल्या शिफारसीबद्दल शरद पवारांची भूमिका दुर्देवी आहे. त्यात खोली आणि संवेदशीलता या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे.

या सल्लागार मंडळाने देशातील ७५ टक्के लोकांना देशातील अन्नसुरक्षा व्यवस्थेत समावेळ करावा, अशी शिफ ारस सरकारला केली आहे. नवीन येऊ घातलेले अन्नसुरक्षा विधेयक हे देशातील गरीब कुटुंबांना ३५ किलो धान्य तीन रूपये दराने देण्याचे आश्वासन देणार आहे तो त्यांता संवैधानिक अधिकार ठरणार आहे.

दादासो पाटील यांची जयसिंगपूर कापड असोशिएशम च्या अध्यक्षपदी निवड

जयसिगंपूर(प्रतिनिधी): येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकेर्त दादासो पाटील यांची जयसिंगपूर कापड असोशिएशनच्या अध्यक्षपदी नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली.

भ्रष्टाचाराची गंगोत्री थांबणार कधी?

देशातील सगळी परिस्थिती पाहता आपला देश बनाना रिपब्लिकच्या दिशेनं वाटचाल करतोय. रतत टाटांचं हे विधाम हे देशातल्या प्रत्येक संवेदनशील माणसाच्या पोटात गोळा आणणारं आहे. जक खरोख़रच या देशाची वाटचाल त्या अराजकतेच्या दिशेने सुरू आहे. तर मग देशातला संवेदनशील माणूस अजूनही गप्प का?

भारताच्या इतिहासात २०१० हे वर्षे घोटाळ्याच वर्षे म्हणून अजरामर होऊल एवढे घोटाळे उघडकीस आले.केवळ घोटाळ्याची संख्याच नाही तर पैशांचे आकडे आणि त्यात राजकारण्यापासून लष्करातल्या अधिकाऱ्यांपर्यंतच्या लुटांरूची संख्याही अशीच रेकॉर्डब्रेक. टुजी स्पेक्ट्रम, राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनातला भ्रष्टाचार, आदर्श घोटाळा, बँक लोन घोटाळा, आयपीएल घोटाळा अशा असंख्य घोटाळ्यांनी देशाची मान शरमेनी खाली गेली. लोकशाही कलंकित झाली. या सगळ्या गदारोळात सिस्टिम च्या चेहऱ्यावरचा तो चारित्र्याचा आणि नैतिकतेचा बुरखाही फाटल्याने त्यांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली.

वर्तमानपत्र उघडल्यावर घोटाळ्याची बातमी नाही असा दिवस उजाडत नाही. संसदेपासून ग्राहक पंतायतीपर्यंतच्या लोकशाहीच्या प्रत्येक दाराबाहेर दलालांच राज्य आहे. त्यांना प्रसन्न केल्याशिवाय लोकशाहीतला कोणताही अधिकार किंवा हक्क आपल्या पदरात पडत नाही ही वस्तु-स्थिती आहे. देशातील सगळी परिस्थिती पाहता आपला देश बनाना रिपब्लिक च्या दिशेनं वाटचाल करतोय, असं सडेतोड मच ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांनी व्यक्त केलं. टाटांच विधान या देशात भ्रष्टाचार किती आहे. हे दाखवून दिलेले आहे. देशाच्या तिजोरीवर देशातल्याच अनेक पांढरपेशा लुटांरूकडून टाकल्या जाणाऱ्या खुलेआम दरोड्यानंतरही या तिजोरीचा मालक शांत का? असा प्रश्न पडतो.

माहितीच्या अधिकारावरून आदर्श प्रकरण बाहेर काढण्यात आले. मुख्यमंत्र्याना यामध्ये राजीनामा द्यावा लागला. सध्या देशभरात गाजत असलेल्या टुजी स्पेक्ट्रम घोटाळ्यासंदर्भातंल नीरा राडिया आणि रमम टाटा यांच्यातलं यू - ट्यूबवर टाकलेलं संभाषण फक्त १५०० ते १६०० लोकांनी ऐकलंय. पण त्याच यू ट्यूबवर जाऊन मुन्नी बदनाम हो गयी हे गाणे ऐकणाऱ्यांही संख्या ३२ लाखांच्या घरात आहे. याचा अर्थ काय, नीरा राडिया आणि रतत टाटा यांच्याबाबत, इथल्या घोटाळ्याबाबत लोकांना फारसे काहीही देणेघेणे नाही. नीरा राडीया कोण आहे? तिची भूमिका काय? हे अनेकांना सांगता येणार नाही. कारण लोकांच्या मनात या सगळ्या बाबतीत उदासिनता आहे. आज हे प्रकरण उघड झालंय. पुढे त्याची चौकशी होईल, चौकशीत त्यांना क्लिन चीट मिळेल किंवा हे सगळं प्रकरण दाबलं जाईल. काही दिवसांनी त्याच्यावर पडदा पडेल. आणि उद्या नवीन प्रकरण उघडकीस येईल. आजपर्यंत हेच होत आलंय पण हे सगळं कुठे तरी थांबेल असे वाटत नाही. खऱ्या गुन्हेगारांना कधी शासन होत नाही. त्यामुळे जनतेचा न्यायप्रक्रियेवरील विश्वासही कमी होत चाललेला आहे. म्हणून लोक बोलत नाहीत. कदाचित उद्या मतपेठीतून लोक बोलतील. चांगले खासदार पाठवून देणे नि आपल्या समाजाचा विकास साधवून घेणे हे जनतेचेच काम आहे. मात्र निवडून गेलेले थोडकेच खासदार चांगले आहेत. शेतीच्या प्रश्नांवरून खासदार राजू शेट्टी सोडले की एकाही महाराष्ट्रातल्या खासदारांनी साधे लोकसभेत तोंड देखील उघडलेले नाही. हेजळजळीत वास्तव समोर असताना जनता अजून कशी गप्प बसलेली आहे. अनेक प्रश्ने समोर असताना कितीजण यावर उपाय करतात. लोक अजून बोलत नाही असही नाही. केवळ या मुद्यावर लोक संघटित होत नाहीत. खरं तर या भ्रष्ट व्यवस्थेचे फटके सर्वसामान्यांना बसताहेत. त्यांनाही या व्यवस्थेत बदल हवा आहे. परंतु सध्याच्या सिस्टिमला पर्याय काय मागायचा हेच कळत नाही. तो पर्याय त्यांना राजकारणात किंवा अन्य समाजकारणातही कुठे दिसत नाही, कारण सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात काय फरक करावा हेच जनतेला कळत नसावं. आज भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणाऱ्या सीबीआय सारख्या यंत्रणा सरकारच्या दावणीला बांधले गेल्या आहेत. त्यामुळे लोकांचा देखील त्यांच्यावरचा विश्वास देखील उडालेला आहे. म्हणून सरकारच्या नियंत्रणाबाहेर काम करणारी निपःक्ष संस्था किंवा यंत्रणा निर्माण झाल्याशिवाय भ्रष्टाचाराला आळा बसणार नाही. म्हणून लोकपाल विधेयकाचा एकमेव मार्ग दिसतोय.

स्वाभिमानी वृत्तसेवा

आर्थिक उन्नतीसाठी लावा बांबू

अलीकडे विविध वैशिष्ट्यपूर्ण पिकांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. विशेष म्हणजे अशा प्रयोगातून चांगला आर्थिक फायदा होतो असेही आढळून आले आहे. मात्र या दृष्टिकोनातून अजूनही काही पिकांकडे शेतकऱ्यांकडून म्हणावे तितके लक्ष दिले जात नसल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर लागवडीची काही उपयुक्त माहिती शेतकरी बांधवांसाठी देत आहोत. शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देऊन परिसराचा चेहरामोहरा बदलून टाकण्याची किमया असणारी काही खास पिके आहेत. त्यापैकी खैर आणि बांबू यांच्या लागवडीची, संवर्धनाची माहिती आवश्यक आहे. खैराची झाडे पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नैसर्गिकरीत्या उगवतात. सदाहरित प्रकारातील तसेच बाभळीच्या जातीतील हे बहुमोल असे झाड आहे. खैराच्या झाडांमध्ये तीन प्रकारचे वाण आढळून येतात. 'ॲकाशिया कॅट्चॅच' यापासून मुख्यत: लाल आणि पांढरा कात तयार केला जातो. खैराचे झाड काटेरी असून त्याची साल खरबरीत, लालसर किंवा भुरकट रंगाची असते. फांद्यांना संयुक्त पाने येऊन त्याच्या पर्णिका बाभळीप्रमाणे अत्यंत बारीक असतात तसेच पानाच्या बुडाशी काटे असतात. खैराची फुले लहान आणि पिवळसर रंगाची, बाभळीच्या फुलासारखी दिसतात. याच्या शेंगासुद्धा बाभळीच्या शेंगांसारख्या असतात. मुख्य म्हणजे खैराला अधिक

सूर्यप्रकाशाची गरज आहे. हे झाड तोडल्यावर त्यास मर्यादित फळे येतात; परंतु उत्पादनाच्या दृष्टीने ती महत्त्वाची नसतात. योग्य वातावरण मिळाले तर खैराची झाडे १० ते २० फुटांपर्यंत उंच वाढतात. याचा घेरा पाच फुटापर्यंत असू शकतो. मात्र सर्वसाधारणपणे दोन ते तीन फूट घेराची आणि ८–१० फूट उंचीची झाडे महाराष्ट्रातील डोंगरांवर आणि दाट जंगलात सापडतात. खैराच्या सालीत टॉनिक ॲसिड आणि इतर टॅनिनयुक्त रसायने सामावलेली असतात. तसेच खोडामध्ये अल्फा, बिटा, कॅटाचीन, एल हॅपकॅटॅचीन ही द्रव्ये आढळतात.

खैरापासून अनेक आयुर्वेदिक औषधे तयार केली जातात. प्रामुख्याने स्वादिरोळ, खदीरादी कात, खदीराष्टक, खदिरादिवटी, कुंजरारिष्ठ, लवंगादी वटी, चंदनादी वटी इत्यादी कात तयार करण्यासाठी खोडाचे लहान लहान तुकडे करतात आणि ते पाण्यातून उकळतात. त्यामुळे खोडातील टॅनीन मोकळे होते. नंतर त्यावर रासायनिक क्रिया करून कात बनवतात. कात बनवण्याची सर्वसाधारण पद्धती म्हणजे २५ ते ३० वर्षे वयाची झाडे त्यासाठी निवडतात. खैराचे वयोमान आणि घेर यावरून झाडाचा उत्पादनाचा अंदाज वर्तवता येतो. झाड तोडल्यानंतर त्याचे दोन ते तीन फुटांचे तुकडे करतात. त्यानंतर साल आणि गाभ्याचे बाहेरचे लाकूड वेगळे केले जाते. फक्त गाभा भागाचे दोन चौरस सेंटीमीटर आकारमानाचे लहान तुकडे केले जातात. ते मातीच्या भांड्यात १२ तास उकळतात. द्रावण घट्ट होऊ लागेल त्यावेळी ते द्रावण ठराविक आकाराच्या भांड्यात ओतून थंड केले जाते. थंड झाल्यानंतर या द्रावणाला गर्द तपकिरी रंग प्राप्त होतो. गाभ्याच्या मूळ वजनाच्या ३ ते १० टक्के कात तयार होतो. खैरापासून उत्तम प्रकारचा डिंक मिळतो. शिवाय खैराचे लाकूड उत्तम प्रकारचे इमारतीचे

पान १९ वर ▸

आर्थिक उन्नतीसाठी लावा बांबू

▶ पान १८ वरून

लाकूड आहे. या लाकडास वाळवीसारख्या उपद्रवी किडींचा त्रास होत नाही. खैराचे लाकूड कटाईला सोपे आणि जास्त काळ टिकणारे असते. महत्त्वाची बाब म्हणजे ते पॉलिशिंगला उत्तम प्रतिसाद देते. घराचा खांब, उसाचे चरक, नांगर, गलबताचा कणा आणि जोड यासाठी हे लाकूड अत्यंत उपयुक्त ठरते. खेड्यात बैलगाडीच्या चाकाचे तुंबे, आरे, पाटे यासाठी खैराचेच लाकूड आवर्जून वापरले जाते. खैरापासून कोळसा, काजळ, गंध बनवतात. कातडी कमावण्याच्या धंद्यातही खैराच्या लाकडाचा चांगला उपयोग होतो. जनावरांच्या चाऱ्याच्या दृष्टीनेही खैराचे वेगळे महत्त्व आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेळ्या, मेंढ्यांना ओल्या पाल्याचा चारा खैरापासून प्राप्त होतो. त्या अनुषंगाने खैराची चांगल्या अथवा पडीक जमिनीत लागवड करून पैसे मिळवणे शक्य आहे; परंतु याकडे अद्याप दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे म्हणावे तेवढे लक्ष गेलेले नाही. किंबहुना त्यावर फारसे संशोधनही झालेले नाही. नाही म्हणायला डेहराडून येथील 'फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटय़ूट'ने खैरापासून कात बनवण्याची सुधारित पद्धत विकसित केली आहे. या पद्धतीत २५ किलोपर्यंत लाकडाचे तुकडे तांब्याच्या जाळीवर ठेवतात. ही जाळी तांब्याच्या भांड्यात ठेवलेली असते. त्यात पाण्याच्या साह्याने (३० लिटर पाणी) अर्क काढतात. पहिला अर्क निघण्यास दीड ते दोन तास लागतात. अशा पध्दतीने दोन ते तीन वेळा अर्क काढला जातो. तिसऱ्या वेळेचा अर्क सौम्य असतो. तो नवीन लाकडाबरोबर वापरतात. नंतर सर्व अर्क एकत्रित करून त्याची घनता १.०७ ते १.१३ ग्रॅ. घ. सें. मी. होईपर्यंत उघड्या काहिलीत ठेवतात. त्यानंतर चांगल्या प्रतीचा अर्क तयार करतात.

या प्रक्रियेदरम्यान काताचे स्फटिक बनतात. ते काढून घेतात. सर्व स्फटिक पाण्याने धुऊन, कॅनव्हासमध्ये गाळून हाताने दाबून त्याच्या वड्या तयार करतात. या वड्या प्रथम सावलीत आणि नंतर ४० अंश सेल्सिअसवर वायूच्या साहाय्याने जाळीवर वाळवतात. या सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास एक आठवडा लागतो; परंतु या प्रक्रियेतून मिळणाऱ्या मालाचा दर्जा उत्तम असतो. या पद्धतीने एका झाडाच्या लाकडापासून ३ ते ३.५ टक्के कात आणि ८ ते १० टक्के कच्छ मिळतो. हा व्यवसाय कुटीर उद्योग म्हणून विकसित करण्यास बराच वाव आहे. बाजारात काताचे फूल, कात, जनकपुरी कात, गल्ला कात, मधई कात, पापडी कात, गोरा कात इत्यादी प्रकार आढळतात. आपल्याकडे प्राचीन काळापासून काताचा उपयोग विड्यातून खाण्यासाठी केला जातो.

खैराप्रमाणेच बांबूदेखील शेतकऱ्यांना वरदान ठरू शकतो. तो पारंपरिक शेतीव्यवसायही होऊ शकतो. दुष्काळी भागात तसेच नापिक जमिनीत बांबू लागवड यशस्वी होऊ शकते. रोजगार मिळवून देणारा जोडधंदा एवढेच नव्हे तर पैसे मिळवून देणारी शेतकऱ्यांची बँक म्हणजे बांबूचे झाड. म्हणून हे झाड शेतकऱ्यांना वरदान ठरू शकते. बांबूच्या १३० प्रजाती आहेत. बांबूला आवश्यक असणारा सूर्यप्रकाश, पाऊस, जमीन आपल्याकडे मुबलक प्रमाणात आहे. लाकूड म्हणून वापरल्या जाणाऱ्या बांबूच्या १२०० प्रजाती आढळून येतात. काही प्रजातींमध्ये बांबू दिवसाला एक मीटरपेक्षा जास्त वेगाने वाढू शकतात. बांबूची आर्युमर्यादा निसर्गानेच पाच वर्षांपासून १२० वर्षांपर्यंत निश्चित केली आहे. चीननंतर बांबू उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. बांबूपासून चारा, निवारा, औषधे, वाद्ये, फर्निचर, कृषी अवजारे, कागद, चटई, पार्टिशन्स अशा कितीतरी जीवनावश्यक वस्तू बनवल्या जातात. मुख्य म्हणजे नापिक जमिनीवर अल्प ओलाव्यात आणि अत्यंत कमी देखभालीत बांबूची शेती जोपासणे शक्य आहे.

दुष्काळी प्रदेशात सुरुवातीच्या काळात जनावरांपासून संरक्षण केले तर बांबू कोठेही वाढू शकेल, अशी खात्री आहे. बांबूच्या महाराष्ट्रात प्रामुख्याने कळक, मणगा मेस, बोस मेस, कोड्यागेस, चिवा या प्रजाती आढळतात. बांबू चार ते पाच वर्षात परिपक्व होत असल्याने शेतकऱ्यांनी आपल्या गरजेसाठी इतर कोणत्याही झाडापेक्षा बांबूच्या लागवडीवर भर देण्याची गरज आहे. बांबूची लागवड कंदापासून केली जाते. त्यामुळे त्या भागात वाढणाऱ्या प्रजातीपासून सहज मिळणाऱ्या कंदापासून बांबू लागवड वाढवता येते. मात्र, आपल्या भागात चांगल्या प्रकारे वाढणाऱ्या प्रजातीचाच लागवडीसाठी उपयोग करावा. लागवडीसाठी बांबूचे बियाणे आठ ते १० तास थंड पाण्यात भिजवून ठेवावेत. भिजत ठेवलेले बियाणे सकाळी प्रत्येक प्लॅस्टिक पिशवीत दोन ते तीन बिया या प्रमाणात पेरावे. अशा पद्धतीने तयार केलेली बांबूची रोपे तीन-चार महिन्यात लागवडीस योग्य होतात.

स्वाभिमानी वृत्तसेवा